Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# जालना शहरातील महिलांच्या वाचन अभिरुचीचा अभ्यास

**शितल पंढरीनाथ तुपे**
संशोधक विद्यार्थीनी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**प्रस्तावना:-**

सध्याच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या जगातही वाचनाला महत्व आहे. वाचनामुळे बुध्दी प्रगल्भ होते. मन सुसस्कारीत होऊन जिवन समृध्द बनते. म्हणुन ज्ञानप्राप्तीचे मुख्य तंत्र म्हणजे वाचन व शिक्षण होय. प्रकाशीत किंवा हस्तालिखित शब्दाचा अर्थ समजुन घेणे म्हणजे वाचन होय. शब्दार्थ समजुन घेऊन वाक्याचा अर्थ लावण्यासाठी संमीश्र प्रक्रिया म्हणजे वाचन होय.

'विद्या विनयेन शोभते'

ज्ञानासारखी अंत्यत पवित्र अशी जगात दुसरी कोणती गोष्ट नाही. महाविद्यालय हे ज्ञानाचे पवित्र मंदीर असते. सुंस्करीत पिढी घडवण्याचे ते एक संस्कार केंद्रच असते. त्याचप्रमाणे स्त्री ही सुध्दा पिढी घडवण्याचे कार्य करत असते. पुराणात, वेदात म्हटलेच आहे स्त्री ही मनुष्याचा प्रथम गुरु आहे.

आई माझा गुरु,
आई कल्पतरु
सौख्याचा सागर,
आई माझी.

या अवतीप्रमाणे स्त्री एक जागृत व्यक्ती असली पाहिजे . ती जर ज्ञानी असली तर आपल्या मुलांमध्ये योग्य संस्काराची, मार्गदर्शनाची सुरुवात करु शकते. मार्गदर्शक हा सुयोग्य प्रकाशाकडे घेऊन जाणारा मार्गदर्शक असतो. आपल्या बुध्दी सामर्थ्याच्या जोरावर मनुष्य इतर प्राण्यांच्या तुलनेत श्रेष्ठ ठरला आहे. कारण त्याची ज्ञानप्राप्तीची जिज्ञासा मानव हा वर्तमान जगतांना गत काळातील घटीत घटनांचा शोध घेऊन त्यापासुन काहीतरी बोध घेऊन आपले जिवन सुकर व्हावे म्हणुन धडपडत असतो. मानवाचे पहिले विद्यालय म्हणजे घर आणि गुरु म्हणजे आई म्हणुन महीलांनी सुविद्या, साक्षर, वाचक असणे अपरिहार्य आहे. जरी महिला डॉक्टर, इंजिनीअर, प्राध्यापक म्हणून आपले कार्य पार पाडत असतात. त्याचप्रमाणे वाचक या माध्यमातुन त्या एक संस्कारातील पिढी घडवत असतात.

आजच्या धावपळीच्या, स्पर्धेच्या आधुनिक जिवनात व्यक्तीला स्वत:कडे व शरीर विकासाकडे लक्ष देण्यास वेळ नाही. त्यामुळे अनेक वेगवेगळे नवनवीन प्रश्न, व अडचणी वाढल्या आहे. त्यामुळे सर्वागीण ज्ञान आज आवश्यक झाले आहे. नविन ज्ञानापासुनच समाजातील प्रत्येक घटकांचा विकास शक्य आहे. आणि हे सर्व आपल्याला पुस्तकामार्फत मिळु शकते. त्यासाठी महिलांना स्वत:च्या कुंटुबांच्या, समाजाच्या उत्कर्षासाठी वाचन साहित्य ग्रंथ, साप्तहिक, मासीक, वर्तमानपत्रे आदीसारखे वाचन साहित्ये मिळवुन ते वाचण्यासाठी व ज्ञानसंपादनासाठी वाचन अभीरुची वाढणे आवश्यक ठरते. त्यामुळे महिलांमध्ये वाचनाची सवय असणे आवश्यक आहे.

विदये विना मती गेली,
मती विना निती गेली,
निती विना शुदृ खचले,
सारे अनर्थ एका अविद्येने केले ||

महात्मा फुलेच्या या अभंगाप्रमाणे ज्ञानाच्या अभावामुळे मनुष्य शुन्य ठरतो. आंधळया व्यक्ती प्रमाणे त्याची अवस्था होते. ज्ञानी मनुष्य हा सर्वत्र पुजनिय ठरतो. अज्ञान हे सर्वात मोठे दारिद्रय आहे. अज्ञान हा शाप आहे. ज्ञानी मनुष्य पुजेस पात्र आहे. वाचन माणसाच्या व्यक्तित्व विकासाचे एक साधन आहे. काय वाचतो या वरुन त्याची जडण घडण समजु शकते. व्यक्तीचे वाचन त्याच्या शिक्षणावर संस्कारावर व दैनंदिन व्यवसायावर अवलंबुन असते.

**अभिरुची म्हणजे काय ? :-**

व्यक्तीच्या जिवनात त्यांच्या अभिरुचीना आवडी निवडीला विशेष स्थान असते. ज्या कामाची व्यवसायाची व छंदाची व्यक्तीत आवड असते. ते काम व्यवसाय वा छंद ती व्यक्ती मनापासुन करते किंवा यात स्वत:ला झोकून देते.

**व्याख्या :-**

"**एखादया** अनुभवात स्वत:ला गुंतवून ठेवण्याची व ती अनुभव दिर्घकाळ चालु ठेवण्याची प्रवृत्ती म्हणजे अभीरुची होय."

**अभिरुचीचे प्रकार :-**

१. नैसर्गिक अभिरुची :-ज्ञानेंद्रियांची जी उपजत क्षमता असते या सापेक्षतांवर असणाऱ्या अभिरुचीला अभिरुची असे म्हणतात.

२. कृत्रीम अभिरुची :- ज्ञानेंद्रियावर, बुध्दीवर सुयोग्य प्रकारचे संस्कार करुन त्यांना प्रशिक्षीत करुन जी जाणीवपुर्वक अभिरुची निर्माण केली जाते ती कृत्रीम अभिरुची होय.

**अभिरुचीचे वैशिष्टये:-**

1. अभिरुची मुळे व्यक्तीस कृती करण्यास प्रेरणा मिळते.
2. अभिरुचीचा विकास वंशदाय व वातावरण यांच्या सहयोगातून होतो.
3. अभिरुची ही व्यक्तीमत्वातील साधारण स्थीर स्वरुपाची असते.

**संशोधनाचा विषय :-**

महिला नेहमी कुटूंबासाठी सतत विविध प्रकारे विचार करतांना दिसतात. स्वत:ची कौटूबींक भुमिका पार पाडुन, स्वत:ची आवड सांबाळून मुलांच्या विकासाकडे व प्रगतीकडे लक्ष देणे जरा कठीणच असते. महिला ही तीच्या मुलांची पहिली मार्गदाता असते. मुलांना यशाकडे घेऊन जाण्याचे काम महिलांना चांगल्या प्रकारे करावे लागते. मुले ही आजच्या प्रगतीशील समाजाचे महत्वाचे घटक आहे. अशा माहिलांच्या बाबत असणारी भावना, त्यांच्या जिवनाची व व्यक्तीमत्वाची असलेली उत्सुकता व महिला काय वाचतात? त्याची वाचनाची अभीरुची कशी आहे. याविषयी जाणुन घेणे आवश्यक म्हणुन हे कार्य हाती घेतले.

महिला संवेदनशील, आपुलकी, जिव्हाळा सांभाळणाऱ्या असतात. थोडया एकाकी असतात. ज्याच्या मनाचा कोपरा रिकामा असतो. वाचन सवयीमुळे त्याच्यांत एक आत्मविश्वास निर्माण होते. सर्तकता डोळसपणा येतो. यामुळे स्वत:च्या व त्यांच्याशी निगडीत असण्याऱ्या घटकांचा ज्ञानार्जनामुळे उत्तमप्रकारे उपयोग होऊ शकतो. यामुळे व्यक्तीत्व विकसीत होण्यास मदत होत. यासाठी दर्जेदार वाचन साहित्य मिळणे अंत्यत आवश्यक आहे. आवश्यक असल्यास ती एक प्रकारची मानवी जीवनाची अमुल्य सेवा आहे. वाचन संस्कृती वाढुन वाचकांना संख्येत ही भर पडेल हे कार्य करतांना महिलांना स्वत:चे सहकार्य मिळेल. त्यांची पिढी सुखकर, समृध्द, निरोगी बनवण्यासाठी काही प्रमाणात का होईना समाजाला मदत होईल.

वाचन हा सत्य शोधन्याचा चाललेला अखंड प्रवास आहे. ज्या देशातील, नागरिक, लेखक विचारवंत, शास्त्रज्ञ, वकील, नेते, वेद्यनिक व तरुण महिला वाचनाची आवड जागरुकतेने जोपासतात. राष्ट्र अवघ्या जगावर अधिराज्य करु शकते. नेत्र दिपक प्रगती व उज्जवल भवितव्य घडवु शकते. भवितव्य घडवण्यासाठी समाज सुदृढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी महिला ही इतर घटकापेक्षा तीतकीच महत्वाचा घटक असते. पण त्यांना परिपक्व होण्यासाठी वाचन आवश्यक आहे.

**संशोधन विषयाचे स्पष्टीकरण :-**

कोणत्याही विषयाचा विकास हा त्याच्या विषयाचा अभ्यास व त्याविषयावरील संशोधनावर अवलंबुन असतो. वास्तव विषयाशी निगडीत संशोधनासाठी जालना शहरातील महिलांच्या वाचन अभीरुचीचा अभ्यास या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली. सदरील संशोधनामध्ये महिलांची वाचन अभिरुचीचा अभ्यास करतांना कथा, कांदबरी, नाटक तथा अन्य साहित्य असे घेण्यात आले आहे. सदरील साहित्याच्या माध्यमातून महिलांची अभिरुची कोणत्या प्रकारच्या वाचनात आहे. त्यांना कोणत्या प्रकारचे साहित्य वाचन करावयाला अधिक चांगले वाटते हे एका अभ्यासातून शोधण्याचे काम यामध्ये करण्यात आले आहे.

**संशोधन विषय निवडीची कारणे :-**

संशोधनासाठी अनेक विषय उपलब्ध असुन सुध्दा अभ्यासासाठी जालना शहरातील महिलांच्या वाचन अभिरुचीचा अभ्यास हा विषय निवडला कारण निरीक्षणा अंती असे जाणवले की, मंहिलांच्या वाचन अभीरुची कडे लक्ष दिल्यास समाजाच्या व त्यांच्या मानसिक स्थितीचा अभ्यास करुन जर महिलांमध्ये अभीवृध्दी झाली तर हा एक सकरात्मक प्रयत्न झाला असे वाटते. कारण महिला हया अतिशय महत्वांचा घटक आहे. त्यांच्या गरजा जाणुन घेण्यासाठी निरीक्षण व प्रश्नावलीद्वारे प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या वाचन सवयी वाढण्यासाठी कोणते प्रयत्न करता येईल याचे निष्कर्ष काढता येतील. वाचक व महिला वाचकांची अभीरुची थोडक्यात भिन्न असते. परंतु यामध्ये ही अनेक प्रकारचे वाचक आढळतात. ते ज्या परिस्थितीतुन गेलेले असतात किंवा त्याक्षेत्राचा यांच्यावर कसा प्रभाव पडलेला आहे. महिला ही सुजान, सुसंस्कार घडवणारी एक जबाबदार घटक आहे. ती विचाराने सुसंस्कृत झाली पाहिजे. म्हणुन हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधन उद्दिष्टे :-**

कोणतेही संशोधन कार्य हाती घेण्यासाठी उ्दिष्टे ठरवावी लागतात. "समृध्द साक्षर जनता भुषण भारता" या म्हणी प्रमाणे समृध्द जनता तयार करण्यासाठी महिलांनी वाचन साहित्य करणे क्रमप्राप्त ठरते .

**प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. जालना शहरातील महिलांच्या वाचन अभिरुची जाणून घेणे.
२. सदरील महिला कोणते वाचन साहित्य जास्त प्रमाणात वाचतात याचा शोध घेणे.
३. सदरील महिला वाचकाच्या माहितीच्या गरजा कोणत्या स्वरुपाच्या आहे ते जाणुन घेणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. महिला जास्तीत जास्त प्रमाणात कथा/ कांदबरी/ कविता/ इत्यादी ग्रंथ वापरतात.
२. वाचन साहित्यात ग्रंथेत्तर व संदर्भ साहित्य वापराचे प्रमाण अत्यल्प आहे.
३. दैनंदिन वृत्तपत्र, नियतकालीके यांचे महिला वाचन करते.
४. महिला जालना शहरातील ग्रंथालयाचा वापर करतात.

**नमुना निवड :-**

संशोधनामुळे सर्व घटकांना समान संधी व महत्व दिले जावे म्हणुन संभावता: नमुना निवड या पध्दतीतील स्तरिय यादृच्छीक स्वरुपाची पध्दती सदरील संशोधनासाठी घेण्यात आलेली आहे. या पध्दती मध्ये अत्याधिक स्वरुपाची प्रतिनिधीकता नसते. त्यामुळे वाचकांना समान संधी व महत्व दिले जाते. या पध्दतीनुसार सदर प्रकल्पासाठी या जालना शहरातील महिला वाचकांची निवड करुन त्यांना १०० प्रश्नावल्या वितरीत केल्या असता ८० % प्रश्नावल्या भरुन परत प्राप्त झाल्या . म्हणजे ८० % वाचकांना प्रतिसाद मिळाला व त्याचे संकलन केले आहे. अशा माहितीच्या प्रश्नावरून विश्लेषण केले आहे.


**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

संशोधन ही सतत चालणारी प्रक्रीया आहे. पंरतु अपेक्षित निष्कर्ष मिळवण्यासाठी स्थळ आणि काळाचे बंधन पाळावेच लागते. म्हणुन प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही जुना जालना शहरापुर्तीच मर्यादीत आहे. विषयाला अपेक्षित नियम अनुसरुन संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ठरलेली आहे. प्रस्तुत संशोधनात जालना शहरातील महिलांच्या वाचन अभिरुचींचा अभ्यास या विषयाची निवड केली आहे.

**वाचन करायला आवडणारा साहित्य प्रकार दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | वाचक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कथा | २८ | ३५% |
| २ | कांदबरी | १८ | २२.०५% |
| ३ | नाटक | ०७ | ०८.७५% |
| ४ | इतर | २७ | ३३.७५% |
| | एकुण | ८० | १००% |

**वाचन करायला आवडणारा साहित्य प्रकार दर्शविणारा आलेख**




वरील सारणीवरुन असे दिसुन येते की, महिला कथा वाचकांची संख्या २८ असुन टक्केवारी ३५ इतकी आहे. कांदबरी वाचक महिलांची संख्या १८ असून टक्केवारी २२.०५ इतकी आहे. नाटक वाचक महिलांची संख्या ७ असून टक्केवारी ८.७५ इतकी आहे. तर याशिवाय इतर साहित्य वाचन करणा-या महिलांची संख्या २७ असून टक्केवारी ३३.७५ इतकी दिसून आली.

**निष्कर्ष :-**

वरील संशोधनावरुन असे दिसून आले की, एकूण वाचन करणा-या महिलांपैकी अधिक महिलांना त्यांच्या अभिरुचीनुसार कथा वाचन करायला खूप अधिक आवडते. त्यानंतर कांदबरी व नाटक असे उतरत्या क्रमांने साहित्य वाचन करायला आवडते. व याशिवाय ३३.७५ महिलांना संशोधनासाठी घेतलेल्या कथा, कांदबरी व नाटक इत्यादी साहित्याशिवाय इतर साहित्य वाचन करायला आवडते.

सदरील संशोधनानुसार महिलांना त्यांच्या आवडीनुसार साहित्य उपलब्ध करुन देण्यास मदत होईल. तसेच यामुळे महिलांना लागणारे आवडीनुसार साहित्य सहज उपलब्ध झाल्यामुळे इतर वाचक गटातील महिलांना वाचन करण्याची अभिवृत्तीमध्ये निश्चित वाढ होण्यास मदत मिळणार आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१. जी.शी. लक्ष्मण शास्त्री, मराठी विश्वकोश, खंड १५ वाई सातारा, म.रा.म. विश्वकोष निर्मिती मंडळ १२६५ ते १२७८

२. वानखेडे प्रतिभा प्रमोद, शिक्षण सांक्रमन, म.रा. मा.व. ऊ. मा. शि. मंडळ पुणे ऑक्टो , २००६ पृ.९८.

३. ठाकरे रविंद्र भास्कर, संबोधन प्रकल्प रा.व.मु.वि. नाशिक २००६-२००७ पृष्ठ क्र. ३

४. आगवणे राजेश ग्रंथ वाचन परिवार नोव्हेंबर व डिसेंबर २००५ पृ. क्र. ८-१०.

५. दवेरे. के. व्ही. शिक्षणशास्त्र निराली पब्लीशर्स, ४१० शनिवार पेठ, पुणे जुन ००७ पृष्ठ. ३

६. वानखेडे प्रतिभा प्रमोद, शिक्षण सांक्रमन, म.रा. मा.व. ऊ. मा. शि. मंडळ पुणे ऑक्टो , २००६ पृ.३२.

७. तुपे न.म. वाचन हा शिक्षणाचा कणा आहे. संवाद पत्रीका औरंगाबाद डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद दि. २६ जानेवारी २००६ पृष्ठ .३

८. खाडीलकर प्रभाकर शिक्षण संक्रमण म.रा.मा. व उ.मा. शि. मंडळ पुणे , जाने .२००७ पृष्ठ . ३२.

९. कराड सायस सोमवंशी, दयानंद बी. एड् प्रवेश पुर्व परिक्षा मार्गदर्शक, संस्कार प्रकाशन लातुर पृ ३ ते ८.

१०. आर्वीकर भा.बा. सातारकर सु.प्र. सार्वजनिक ग्रंथालय, सध्यस्थिती व बदलते स्वरुप, औरंगाबाद १९ एप्रिल २००७ पृ.क्र.३,८

११. संशोधन पध्दती मुलतत्वे, डॉ. दत्ता देशकर, अजय प्रकाशन औरंगाबाद .डिसेंबर २००६ पृ. २५